# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
**Savitribai Phule Pune University**
**Formerly Pune University**

अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष
गणेशखिंड, पुणे – ४११००७
दूरध्वनी क्रमांक : ०२०–२५६२१०४८/४९
ई–मेल : iqac@unipune.ac.in
संकेतस्थळ - www.unipune.ac.in

**Internal Quality Assurance Cell**
**Ganeshkhind, Pune – 411007**
**Contact No. : 020-25621048/49**
**E-mail - iqac@unipune.ac.in**
**Website – www.unipune.ac.in**


आयक्युएसी/५३०/२०२६ दि. : २९/०१/२०२६

प्रति,
मा. प्राचार्य/प्राचार्या
सर्व संलग्नित महाविद्यालये,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे – ४११ ००७.

**विषय : डॉ. एम. आर. जयकर रोजगारक्षम कौशल्य कार्यक्रम योजनेअंतर्गत ऑनलाईन पद्धतीने प्रस्ताव सादर करणेबाबत.....**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी सर्व संलग्नित महाविद्यालयातील विशेषतः ग्रामीण भागातील तसेच आर्थिक व सामाजिक दृष्टया मागासवर्गातील विद्यर्थ्यांच्या गरजा लक्षात घेऊन डॉ. एम आर. जयकर रोजगारक्षम कौशल्य कार्यक्रम सन २०१८–१९ पासून सुरू करण्यात आलेला आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५–२६ साठी सदर योजनेअंतर्गत मार्गदर्शक तत्वानुसार ऑनलाईन पद्धतीने प्रस्ताव मागविण्यात येत असून त्याची लिंक खलील प्रमाणे आहे
www.unipune.ac.in-BOD-BOD online-Login-for college user Name-password

सदर योजनेचे प्रस्ताव हे फक्त ऑनलाईन पद्धतीने सादर करण्याची अंतिम मुदत बुधवार दिनांक १५ फेब्रुवारी, २०२६ पर्यंत आहे. तसेच, दिनांक १८ फेब्रुवारी, २०२६ ते २३ मार्च, २०२६ रोजी पर्यंत सदर कार्यक्रम घेण्यात यावा.

तसेच, अधिक माहितीसाठी खाली नमुद केलेल्या दूरध्वनी आणि ईमेलद्वारे संपर्क साधावा

संपर्क क्र. : ०२०२५६२१०४८/४९/५१

ईमेल : iqac@unipune.ac.in

कळावे,

29/1/2026

(प्रा. डॉ. विनायक जोशी)
मा. संचालक

संचालक
अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
पुणे–४११ ००७.

सोबत : मार्गदर्शक तत्वे जोडलेली आहेत.

**डॉ. एम. आर जयकर रोजगार कक्ष कौशल्य कार्यक्रम योजनेची मार्गदर्शक तत्वे :**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील संलग्नित महाविद्यालयातील विषेशतः ग्रामीण भागातील तसेच आर्थीक व सामाजिक दृष्टया मागासवर्गातील विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेऊन डॉ. एम आर. जयकर रोजगारक्षम कौशल्य कार्यक्रम सन २०१८—१९ पासून सुरू केला आहे.

सदर योजना अधिक प्रभावीपणे राबविण्याच्या दृष्टीने अस्तित्वात असलेल्या मार्गदर्शक तत्वांमध्ये शैक्षणिक २०१९—२० पासून खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आलेल्या आहेत.

१. डॉ. एम आर. जयकर रोजगारक्षम कौशल्य कार्यक्रम फक्त तृतीय वर्ष कला वाणिज्य व विज्ञान शाखेच्या नियमित विद्यार्थ्यांसाठी राहील.

२. सदर कार्यक्रम राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ, भारतसरकार यांच्या रोजगार व उद्योगक्षमता अभ्यासक्रमावर आधारीत आहे.

३. सदर कार्यक्रमामध्ये २० तास तज्ञांद्वारे वैयक्तिक प्रशिक्षण व ४० तास ई—लर्निंग असा एकून ६० तासाचा समावेश आहे.

४. सदरच्या कार्यक्रमांत दिवसात किमान एक व कमाल २ वैयक्तिक प्रशिक्षण आयोजन करावे. वैयक्तिक प्रशिक्षण एक तासाचे असावे.

५. प्रत्येक तज्ञाला कमाल मर्यादा २ तास एवढी राहील.

६. या कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या संलग्न महाविद्यालयांना ई—लर्निंगची सुविध उपलब्ध करून देण्यासाठी प्रस्तुत विद्यापीठामार्फत बी.ओ.डी. लॉगिनमध्ये राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळामार्फत तीन भषांमध्ये (मराठी, हिंदी, इंग्रजी) उपलब्ध करून देण्यात आलेले ई—बुक ची सुविधा सहभागी विद्यार्थ्यांना देण्यात येईल.

७. ई—लर्निंग व वैयक्तिक प्रशिक्षण यांचे गुणोत्तर २:१ असेल.

८. प्रत्येक गटामध्ये ६० विद्यार्थी असावेत. त्यापैकी ५०% विद्यार्थीनी (किमान ३०) असाव्यात. (विद्यार्थीनींची संख्या निर्धारित संख्येपेक्षा कमी असल्यास विद्यापीठाच्या पूर्व मान्यतेने विद्यार्थ्यांना सहभागी करून घेता येईल.)

९. संबंधीत महाविद्यालयांना शैक्षणिक वर्षातून जास्तीत जास्त दोन विद्यार्थी गटांसाठी (Batch) अर्ज करता येईल.

१०. सदर कार्यक्रमाचे अर्ज विद्यापीठ संकेतस्थळसवर बी.ओ.डी. लॉगीनवरून ऑनलाईन पद्धतीने सादर करता येईल.

११.विद्यार्थ्यांचा अभिप्राय ( Student Feedback) खालीलप्रमाणे तीन टप्यामध्ये अपेक्षीत आहे.
विद्यार्थ्यांचा अभिप्राय (Student Feedback)

| प्रशिक्षणपूर्व | प्रशिक्षण दरम्यान | प्रश्नोत्तर |
|---|---|---|

१२. महाविद्यालयाच्या कार्यक्रम समन्वयकाने विद्यार्थ्यांकडून प्रशिक्षणपूर्व प्रत्याभरण आणि त्यांच्या अपेक्षा जाणून घेण्याकरिता भरून घ्यावेत.

१३. विद्यापीठ समन्वयकाने विद्यार्थ्यांकडून प्रशिक्षणा दरम्यान अभिप्राय (Feedback) घेतले जातील.

१४. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर अभिप्राय घेण्यासाठी विद्यापीठातर्फे स्वतंत्रपणे यंत्रणा राबविली जाईल व त्याद्वारे कार्यक्रमाची निष्पत्ती व परिणामकारकता यांचे विश्लेषण करण्यात येईल.
विद्यापीठाकडून देण्यात येणारे अर्थसहाय्यः—

| एका गटाकरिता (Batch) | | दोन गटाकरिता (Batch) | |
|---|---|---|---|
| **तपशिल** | **रक्कम (रूपये)** | **तपशील** | **रक्कम (रूपये)** |
| तज्ञाचे मानधन<br>प्रती तास रू. १००० प्रमाणे | २०,०००/— | तज्ञाचे मानधन<br>प्रती तास रू. १००० प्रमाणे | ४०,०००/— |

सर्वसाधारण मार्गदर्शक सुचना:—

१. सदर कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या महाविद्यालयांच्या मा. प्राचार्यांनी कार्यक्रमाकरिता एका मान्यताप्राप्त अध्यापकाची समन्वयक म्हणून नियुक्ती करावी.

२. महाविद्यालयाच्या समन्वयकाने मा. प्राचार्यांशी व इतर संबंधित घटकांशी चर्चा करून विद्यार्थी प्रशिक्षणार्थींची निवड करावी व कार्यक्रमाचे आयोजन हे प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातच करावे.

३. सदर कार्यक्रम महाविद्यालयाने स्वतः आयोजित करावयाचा असून बाहेरील इतर कोणत्याही संस्थेला पूर्णतः किंवा अंशतः कार्यक्रम हस्तांतरित करता येणार नाही.

४. सदर उपक्रम राबविण्यास विद्यापीठाच्या समन्वयक यांची पूर्व परवानगी घेणे अनिवार्य आहे.

५. उपक्रमामध्ये सहभागी मा. तज्ञांचे मानधन हे त्यांच्या बॅंक खात्यामध्ये विद्यापीठामार्फत विहित प्रक्रीयेनुसार जमा करण्यात येईल.

६. महाविद्यालय कार्यक्रम समन्चयक यांनी तज्ञांची वैयक्तिक व बॅंक खात्याची माहिती रद्द केलेल्या चेकची प्रत तज्ञांचे विद्यार्थी प्रशिक्षण घेतांनाचे दोन फोटो (वेळ, ठिकाण व दिनांकासह) तसेच सहभागी विद्यार्थ्यांचे स्वाक्षरी असलेले मुळ हजेरीपत्रक व मा. तज्ञांचा प्रशिक्षण अहवाल यासह विद्यापीठ पोर्टलवर अपलोड करण्यात यावे.

७. प्रत्येक महिन्याच्या ०१ तारखेला व १६ तारखेला संबंधित मा. विषयतज्ज्ञांच्या मानधनाचे क्लेम रिपोर्ट तयार करुन पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात येतील.